# आंदोलनासाठी जमवलेला पैसा अण्णांच्या ट्रस्टकडे द्यावा - परुळेकर



नवी दिल्ली, दि. २१- समाजसेवक अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनासाठी गोळा करण्यात आलेल्या निधीवर जर अरविंद केजरीवाल यांचे नियंत्रण राहिले तर अण्णांना हे आंदोलन चालवणे शक्य होणार नाही. आंदोलनासाठी अण्णांच्या नावावर जमवण्यात आलेला निधी राळेगणसिद्धी येथील ट्रस्टला दिला जावा, अशी मागणी अण्णांचे ब्लॉगर पत्रकार राजू परुळेकर यांनी केली आहे. अण्णांना हरियाणातील हिसार लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत प्रचार करायचा नव्हता. त्यामुळेच त्यांनी मौनव्रत धारण केले होते, असा दावाही परुळेकर यांनी केला आहे. येथे पत्रकारांशी बोलताना परुळेकर म्हणाले की, अण्णांच्या नावावर जो पैसा गोळा करण्यात आला आहे, तो अरविंद केजरीवाल यांच्याकडे आहे. तो राळेगणसिद्धी येथील ट्रस्टला परत दिला जावा. अण्णांच्या प्रामाणिकपणामुळेच बऱ्याच लोकांनी निधी दिला आहे, लोकपालसाठी म्हणून हा निधी दिलेला नाही. त्यामुळे आता योग्य हिशेबासह हा पैसा राळेगणच्या ट्रस्टकडे आला पाहिजे.